Vol 6 Issue 11 August 2017 ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# भारतातील दारिद्र्याचा अभ्यास



प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे
उपप्राचार्य व विभागप्रमुख, अर्थशास्त्र , डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू. एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**सारांश :**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून दारिद्र्याची समस्या वास्तव करुन राहिलेली आहे. योजना कालावधीमध्ये दारिद्र्या निवारण्यासाठी प्रभावी उपाययोजना करुन सुद्धा दारिद्र्याची तीव्रता कमी करण्यात अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलशाही, आर्थिक मक्तेदारी वाढत आहे. देशाचा आर्थिक विकासाचा दर वाढत असला तरी उत्पन्नातील विषमतेत वाढ होवून गरीबांची संख्या वाढत आहे. काळ्याा पैशाची समस्या गरीबी आणि दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे. सरकारी उपाययोजना व विकास कार्यक्रमांवर खर्च होण्यासाठीचा पैसा खाजगी तिरोजीत जमा होतो. ही मानवी मूल्यातील घसरण हेही भारतातील दारिद्र्याचे एक महत्वपूर्ण कारण आहे. भारताच्या जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटचालीत दारिद्र्या हा एक मोठा अडथळा ठरतो आहे देशातील दारिद्र्या संपूर्णपणे नष्ट केल्याशिवाय भारताला महासत्तेचा दर्जा मिळणार नाही म्हणून या विषयाच्या अभ्यासाचे महत्व आहे.

**बीजशब्द -** निर्मूलन, मानवी मूल्ये, कुपोषण, उपासमार, दारिद्र्यारेषा, समाजवाद, समाजरचना, लोकसंख्यावाढ.

## प्रस्तावना -

दारिद्र्या ही एक आर्थिक व सामाजिक घटना असून हे एक वास्तव आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही दारिद्र्याची समस्या आढळते. देशाने प्रगतीचे अनेक टप्पे पार केले असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेसमोर लोकसंख्या, बेकारी, गरीबी, आर्थिक विषमता सारख्या समस्या कायम आहेत. आजही देशातील ३० टक्क्यांपेक्षा जास्त जनता दारिद्र्यारेषेखालील जीवन जगत आहेत. भारताच्या जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटचालीतील दारिद्र्या हा मोठा अडसर ठरतो आहे म्हणून या विषयाच्या अभ्यासाला आजही महत्व आहे. शासनाने दारिद्र्याच्या निवारणासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत. परंतु दारिद्र्या सातत्याने वास्तव करुन राहिलेले आहे त्यामुळे दारिद्र्या निर्मूलनाची कार्यरत उपाययोजना अधिक प्रभावी व्हावी, दारिद्र्याच्या विविध अंगाचा आणि सामाजिक बदलांचा, नव्या उपाययोजना, सामाजिक सुरक्षितता ह्याा सर्व दृष्टीकोणातून अभ्यासाची आवश्यकता आहे.

## शोध निबंधाची उद्दिष्ट्ये –

१. दारिद्र्याच्या सद्यःस्थितीबाबत आढावा घेणे.
२. दारिद्र्याची प्रमुख कारणे शोधणे.
३. दारिद्र्या निवारण्यासाठीच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

## गृहिते –

१. शासनाच्या योजनांची अंमलबजावणी दोषपूर्ण आहे.
२. भारतातील मानवी मूल्यातील घसरण हे दारिद्र्याचे महत्वपूर्ण कारण आहे.

## संशोधन पद्धती –

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधन सामुग्रीवर आधारीत आहे. शोधनिबंध तयार करतांना संशोधकाने विविध प्रकाशित साहित्यांचा दुय्यम साधन म्हणून आधार घेतला आहे. दारिद्र्याच्या समस्येसंदर्भात विविध संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, आर्थिक पाहणी अहवाल इत्यादींवरुन माहिती संकलीत करण्यात आली.

## दारिद्र्याची संकल्पना –

भारतात सर्वसाधारणपणे दारिद्र्याची जी व्याख्या केली जाते तिचा आधार अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक किमान गरजांची पूर्तता हा आहे. ज्या कुटुंबाची उत्पन्न पातळी उपभोग खर्चापेक्षा कमी आहे अशा कुटुंबाचा समावेश दारिद्र्यारेषेखाली केला जातो. डॉ. दांडेकर व रथ

यांनी भारतीयांसाठी दररोज २२५० कॅलरीज निकष लक्षात घेवून १६६०.६७ मध्ये दारिद्र्याचे विवेचन केले आहे.

भारतीय नियोजन मंडळाने सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (१६८०.८५) दारिद्र्या या संकल्पनेची व्याख्या केली आहे. त्याचप्रमाणे, ग्रामीण भागात प्रतिदिन प्रतिमाणसी किमान २४०० उष्मांक व शहरी भागात प्रतिदिन प्रतिमाणसी किमान २१०० उष्मांक ज्या व्यक्तीस प्राप्त होत नाही ती दारिद्र्यात आहे असे समजावे.

सन २०००.२००१ च्या जागतिक विकास अहवालात "सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचीत असणे म्हणजे दारिद्र्या होय." अशी दारिद्र्याची व्याख्या केली आहे.

प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, "एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्या होय."

जागतिक बॅंकेने "माणशी दर दिवशी एक डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्यारेषेखालील व्यक्ती होय." अशी दारिद्र्याची व्याख्या केली आहे.

### *विविध काळातील दारिद्र्याचा आढावा –*

भारतातील दारिद्र्याचा विविध टप्प्यातील आढावा घेतला आहे.

### *प्राचीन काळ –*

प्राचीन काळातही दारिद्र्या अस्तित्वात होते, मात्र उपासमारी सारख्या त्याच्या विपरीत परिणामाची काळजी त्या काळातील मूल्य व्यवस्थेने घेतली होती. समाजात कोणीही उपाशी किंवा भूकेले राहणार नाही हे त्या काळातील मूल्य होते. त्यामुळे समाज उपासमार किंवा दारिद्र्यापासून मुक्त होता. आर्थिक नियमापेक्षा नैतिक मूल्यावर व्यवस्था आधारलेली होती. वितरणाच्या बाबतीत सुद्धा आर्थिक तत्वापेक्षा नैतिक मूल्याचा दर्जा मोठा होता. दारिद्र्याच्या निवारणासाठी सामाजिक सहकार्य आवश्यक असल्याचे तत्कालीन विचारवंतांना मान्य होते. त्यामुळे गरीबांसाठी दान व्यवस्था अस्तित्वात होती. कर रुपाने दिलेल्या रक्कमेतून उपासमारीत असलेल्या लोकांना जगविणे आवश्यक आहे असे विचारवंतांनी प्रतिपादन केले. महत्तम सामाजिक हित साध्य करणे हे सरकारचे कर्तव्य मानले होते. अनाथांना सरकारने जगविले पाहिजे असे कौटिल्याचे मत होते. निराधार व असक्षम लोकांच्या बाबतीत सरकारने जबाबदारी मान्य केली होती. वृद्ध व गरीब लोकांना मदत व त्यांचे संरक्षण हे सरकारने आपले कर्तव्य मानले होते. एकंदरीत नैतिक व आर्थिक मूल्ये व्यवस्थेत स्विकारली असल्याने ती व्यवस्था अत्यावश्यक तत्वावर आधारीत होती. थोडक्यात, प्राचीन काळात दारिद्र्या होते, मात्र राज्य कारभार व समाजव्यवस्थेत प्रचलित मूल्यांचा स्वीकार केलेला असल्याने दारिद्र्याचे निवारणही होत होते.

### *मध्ययुगीन कालावधी -*

मध्ययुगीन काळात दारिद्र्या अस्तित्वात होते, मात्र मूल्य व्यवस्थेने कमी.अधिक प्रमाणात त्याचे निवारण केले होते. समाजातील लोकांच्या जीवन आवश्यकतांची सामुहिक तरतूद असल्याने दारिद्र्याची काळजी घेतली होती. उदा. मध्ययुगीन काळातील अनेक राज्यांनी अन्नछत्र व लोकांसाठी विश्वस्त व्यवस्था चालवता याव्यात म्हणून मंदिरे व धार्मिक संस्थांना अनुदाने दिलेली आहेत. सरकार किंवा राजाचा तो एक नैतिक व आर्थिक व्यवहार होता. थोडक्यात, दारिद्र्या अस्तित्वात होते मात्र त्याचा विपरित परिणाम म्हणजे उपासमारीची समाजात प्रचलित असलेल्या मूल्य व्यवस्थेने काळजी घेतली होती.

### *ब्रिटिश कालावधी –*

ब्रिटिश कालावधीत भारताच्या मूल्यव्यवस्थेत आमुलाग्र बदल झालेत. निर्वाहापासून नफा प्राप्तीसाठी माणसामाणसात स्पर्धा सुरु झाली. त्याचा परिणाम म्हणून दारिद्र्याची तीव्रता फार वाढली. भारतात ब्रिटिश कालावधीमध्ये संपत्तीचा संचय करु इच्छीणाऱ्या लोकसंख्येच्या नवीन वर्गास प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे नफा प्रेरित अर्थव्यवस्थेत रुपांतर झाले. विज्ञान व तंत्रज्ञानातील विकासाबरोबरच नविन औद्योगिक रचना निर्माण होवून समाजाची नव्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय जडण.घडण झाल्याने मूल्यव्यवस्थेत बदल झाला. त्यामुळे दारिद्र्याची तीव्रता वाढून ती एक भारतीय अर्थव्यवस्थेची नियीमत समस्या म्हणून पुढे आली.

### *स्वातंत्र्योत्तर कालावधी –*

स्वातंत्र्यानंतर भारतात स्वतंत्र राज्यघटना तयार करण्यात आली. समस्यांचे निवारण करण्यासाठी राज्याची मार्गदर्शक तत्वे त्यामध्ये समाविष्ट झाली. आर्थिक नियोजनाबरोबरच लोकशाही समाजवाद व मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्याद्वारे समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे ठरले. दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. मात्र सरकारने अवलंबिलेल्या कल्याणकारी धोरणाचा परिणाम म्हणून मृत्यूदर घटल्याने दारिद्र्याची समस्या अधिक गंभीर बनली. ह्या सर्व प्रयत्नात मूल्यव्यवस्थेकडे फारसे लक्ष न दिल्याने दारिद्र्या निर्मूलनास अपयश आले.

### *भारतातील दारिद्र्याची सद्यःस्थिती –*

१६४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आपला देश अत्यंत गरीब व दारिद्र्याने पिचलेला होता मात्र गेल्या ७० वर्षात आपण मध्यम उत्पन्न असणाऱ्या मालीकेत दाखल झालो आहोत. १६७३.७४ मध्ये जवळपास ५५ टक्के लोकसंख्या दारिद्र्यारेषेखाली होती परंतु दारिद्र्या निर्मूलन कार्यक्रमामुळे यात १६६३.६४ पर्यंत ३६ टक्के पर्यंत घट झाली. २००२ पर्यंत २६ टक्के घट झाली. २०११.१२ मध्ये २१.६२ टक्के भारतीय जनता दारिद्र्यारेषेखाली असल्याचे अनुमान होते. रंगराजन ह्यांच्या अहवालामुळे साधारणतः ३६ कोटी ३० लाख नागरीक गरीब म्हणवून घेण्यास पात्र ठरतील याचाच अर्थ आपण विकासाचा विशिष्ट टप्पा गाठला तरी त्या प्रमाणात दारिद्र्या कमी होत नसल्याचे दिसून येते.

सन १६६६.२००० मध्ये दारिद्र्यारेषेखालील लोकांचे सर्वात जास्त प्रमाण ओरिसा ह्या राज्यात होते (४७.१० टक्के), तर दारिद्र्याचे सर्वात कमी प्रमाण जम्मू.काश्मिर या राज्यात होते (३.५० टक्के). सन १६६६.२००० मध्ये भारतात ओरिसा खालोखाल बिहार (४२.६० टक्के), मध्य प्रदेश (३७.४० टक्के), सिक्कीम (३६.४० टक्के), आसाम (३६.१० टक्के), त्रिपुरा (३४.४० टक्के), नागालॅण्ड (३२.७० टक्के), उत्तर प्रदेश (३१.२० टक्के), मणीपूर (२८.५० टक्के), आणि महाराष्ट्र (२५.०० टक्के), दारिद्र्यारेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण

होते. या व्यतिरिक्त अंदमान.निकोबार मध्ये २१.०० टक्के, कर्नाटक राज्यात २०.०० टक्के, मिझोरम मध्ये १६.५० टक्के, लक्षद्विप मध्ये १५.६० टक्के, गुजरात राज्यात १४.१० टक्के व केरळ राज्यात १२.७० टक्के प्रमाण होते.

*भारतातील दारिद्र्याची कारणे-*

भारतासारख्या विकसनशील देशातील लोकांच्या दारिद्र्यास विविध घटक कारणीभूत आहेत.

• समाजाच्या निर्मितीपासून संपूर्ण मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये समाजात दारिद्र्या होते. मात्र दारिद्र्याच्या विपरित परिणामाची काळजी त्या. त्या काळातील मूल्य व्यवस्थेने घेतली होती. समानता, उत्पन्नाचे मानवतावादी वितरण, गुणवत्ता वस्तूंची तरतूद वगैरे मूल्याधिष्ठीत व्यवस्थेने महत्वाचे घटक आहेत. ह्याा मूल्यांची भारतीय अर्थव्यवस्थेत झालेली घसरण हे दारिद्र्याचे एक महत्वपूर्ण कारण आहे.

• वाढती लोकसंख्या किंवा लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असणे हा प्रमुख घटक आहे. जगात सर्वात जास्त लोकसंख्या वाढीचा वेग आपल्या देशाचा असून याबाबतीत आपण चीनला केव्हाच मागे टाकले आहे. वाढती लोकसंख्या हा घटक दारिद्र्याचे कारण तसेच परिणाम सुद्धा आहे. दारिद्री कुटुंबाचा आकार मोठा असतो. त्यामुळे कुटुंबातील सर्वांचे पालनपोषण कुटुंब प्रमुखाला करता येत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंब आणखीनच दरिद्री बनते.

• कमी मजुरी, दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई, बेरोजगारी, कुपोषण, भूमीहीनता, अपुरी आणि निकृष्ट शेतजमीन, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा, अनिष्ठ प्रथा, वेठबिगारी, पूरक व्यवसाय व स्वयंरोजगार नफ्यात न चालणे इत्यादी विविध घटक भारतीय जनतेच्या दारिद्र्यास कारणीभूत आहेत. भारतासारख्या विकसनशील देशातील लोकांच्या दारिद्र्यास कारणीभूत असणारा आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे भारतासारख्या विकसनशील देशांची सरकारेच आर्थिकदृष्ट्याा सक्षम नाहीत. याचाच अर्थ असा की, राष्ट्र किंवा राष्ट्राची अर्थव्यवस्थाच जर दारिद्री असेल तर त्या राष्ट्रातील बहुसंख्य जनतेला सुद्धा दारिद्र्यातच खितपत पडावे लागते.

• काळ्याा पैशाची समस्या सुद्धा भारतातील गरीबी आणि दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे. सरकारी उपाययोजना, सेवा.सुविधा व विकास कामांवर खर्च करण्यासाठी सरकारी तिजोरीत जमा होणारा पैसा काळा पैशाच्या स्वरुपात खाजगी तिजोरीत जमा होतो. त्यामुळे देशातील गरीबी व दारिद्र्या निर्मूलनाचे कार्य परिणामकारक होत नाही.

• भारताने स्वातंत्र्यापासून विकासावर लक्ष केंद्रित केले. त्याचे परिणाम काही क्षेत्रातील विकासाच्या माध्यमातून दिसून आले परंतु या विकासाचा फायदा सामान्य जनतेपर्यंत पोहोचला का? हा खरा प्रश्न आहे.

*दारिद्र्याचे दुष्परिणाम –*

'दारिद्र्या' ही व्यक्ती समोरीलच नाही तर देशासमोरील गंभीर स्वरुपाची समस्या आहे. दारिद्र्याचे भयंकर परिणाम ज्याप्रमाणे दरिद्री व्यक्तीला भोगावे लागतात तसेच राष्ट्राला किंवा सरकारलाही भोगावे लागतात.

• दारिद्र्यामुळे व्यक्तीची, कुटुंबाची प्रगती होत नाही. मुलांना चांगले शिक्षण देता येत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंबाचा गाडा दारिद्र्याच्या चिखलात अधिकच रुतून बसतो. दारिद्र्यामुळे कुटुंबातील कोणालाच पोटभर व चांगले अन्न मिळू शकत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंबातील व्यक्तींची कार्यक्षमता अत्यंत कमी राहते. कार्यक्षमता कमी असल्याने मजुरी देखील कमी मिळते. त्यामुळे दारिद्र्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनतो. दारिद्री व्यक्तींना समाजात मान.सन्मान प्राप्त होत नाहीच, वरुन सर्वत्र अवहेलना होत असते. हा दारिद्र्याचा सामाजिक परिणाम मानता येईल.

• दारिद्र्यामुळे देशाच्या लोकसंख्या वाढीचा वेग वाढून लोकसंख्येच्या आकारात वाढ होते. भारतात एकेका दरिद्री कुटुंबात चार ते सहा अपत्ये दिसून येतात. देशात दारिद्र्याचे प्रमाण जेवढे जास्त तेवढा लोकसंख्या वाढीचा वेग आणि लोकसंख्येचा आकार मोठा असतो. दारिद्र्यामुळे देशात अतिरिक्त लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होतो व अतिरिक्त लोकसंख्येमुळे देशात अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होतात. या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे देशाच्या विकासाचा वेग मंदावतो.

• देशात दारिद्र्यारेषेखालील लोकांची संख्या जर जास्त असेल तर देशाच्या सरकारला दारिद्र्या निर्मूलनाच्या कार्यक्रमावर मोठा खर्च करावा लागतो. यापैकी बराचसा खर्च अनुत्पादक असतो. आरोग्य किंवा औषधोपचार यावर केलेला खर्चही अनुत्पादकच असतो. अशा खर्चांमुळे उत्पादक कामासाठी पैसा कमी पडतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत नाही. राष्ट्राचा विकास कमी गतीने होतो हा दारिद्र्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा गंभीर परिणाम होय.

• दारिद्र्यामुळेच भारतात लहान.मोठ्याा अनेक शहरात मोठ्याा प्रमाणात बेसुमार झोपडपट्ट्याा उभ्या राहिल्याचे चित्र आहे. गुन्हेगारी, व्यसनाधिनता, देहव्यापार, कुपोषण, बालमृत्यू, उपासमार, भूकबळी इत्यादी अनेक गंभीर समस्या दारिद्र्यामुळेच निर्माण झाल्या असून या समस्यांना केवळ दरिद्री व्यक्तींनाच तोंड द्यावे लागत नाही तर सरकारला व समाजालाही या समस्यांशी सामना करावा लागतो आहे.

• भारतासारख्या देशात नक्षलवादी चळवळीचा जन्म होण्यास आणि ही चळवळ अनेक राज्यात पसरण्यास जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये आदिवासींचे दारिद्र्या हा प्रमुख घटक आहे. दारिद्र्यामुळेच गरीब आदिवासींनी सरकारच्या विरोधात शस्त्र उपसले आहे.

• भारतात बाल मजुरीला कायद्याने बंदी असली तरी असंघटीत क्षेत्रात बाल.मजूर आढळून येतात. यास दारिद्र्या हाच प्रमुख घटक जबाबदार आहे.

अशा रितीने दारिद्र्यामुळे अनेक अनिष्ट आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणाम व्यक्ती, कुटुंब पर्यायाने समाजावर, अर्थव्यवस्थेवर व देशावर घडून येतात.

*दारिद्र्या निर्मूलनासाठी शासनाचे प्रयत्न –*

कोणत्याही देशात दारिद्र्या अस्तित्वात असणे ही अतिशय गंभीर अशी बाबच नाही तर त्या देशाची प्रतिमा मलीन होणारी बाब आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत नजिकच्या काही वर्षात अमेरिकेसारखी महासत्ता बनण्याची क्षमता आहे. परंतू देशातील दारिद्र्या संपूर्णपणे नष्ट केल्याशिवाय भारताला महासत्तेचा दर्जा मिळू शकणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. देशातील दारिद्र्या संपविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने अनेक उपाय योजना केल्या आहेत. .

*• सार्वजनिक वितरण व्यवस्था –*

दारिद्र्या निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. या व्यवस्थेअंतर्गत गोरगरीब जनतेला स्वस्त दरात धान्याचे वितरण केले जाऊ लागले. या योजनेचे मूल्यांकन करण्याचे काम नियोजन आयोगातर्फे २००५ मध्ये झाले त्यात या योजनेची अंमलबजावणी अत्यंत खालच्या दर्जाची असल्याचे दिसून आले.

सद्यःस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून दारिद्र्यारेषेखालील जनतेला अन्न.धान्य उपलब्ध करुन देण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन देणे आवश्यक आहे.

*• महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना –*

देशात केंद्र सरकारने सप्टेंबर २००५ मध्ये आदेशाद्वारे राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण रोजगार हमी कायदा पास केला. या योजनेनुसार ग्रामीण भागातील कोणत्याही व्यक्तीला ती श्रमाचे काम करण्यास तयार असल्यास तिला किमान वेतन दराने वर्षाला १०० दिवस रोजगार देण्याची हमी केंद्र सरकारने दिली आहे. स्वयंपाकाचा गॅस आणि मनरेगा मधील अनुदानाच्या थेट बँकेतील हस्तांतरणामुळे भ्रष्टाचारात घट झाली आहे.

*• अन्नसुरक्षा कायदा –*

५ जुलै २०१३ रोजी अन्नसुरक्षा कायदा लागू केला होता आणि राज्य सरकारांना तो ३६५ दिवसांच्या आत लागू करावयाचा होता. त्याची मुदत जुलै २०१४ पर्यंत होती. हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र, पंजाब व छत्तीसगड या राज्यांनी अन्नसुरक्षा कायदा पूर्णपणे लागू केला आहे. तर दिल्ली, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, बिहार मध्ये तो अंशरुपाने लागू केला आहे. अन्नसुरक्षा कायद्याद्वारे ग्रामीण भागातील ७५ टक्के लोकांना व शहरी विभागातील ५० टक्के लोकांना दरडाई दरमहा ५ किलो धान्य, तांदुळ, गहू आणि भरड धान्य अनुक्रमे ३ रुपये, २ रुपये व १ रुपया किलोप्रमाणे देण्याचा निर्णय घेतला या कायद्यात काही त्रुटी आहेत त्या दूर करुन या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

*• पंतप्रधान जनधन योजना –*

१५ ऑगस्ट २०१४ या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान मोदींनी पंतप्रधान जनधन योजनेची घोषणा केली होती व त्याची सुरुवात करण्यात आली. या योजनेअंतर्गत देशातील गरीब नागरीकांचे बँक खाते उघडण्यात येतील, त्यांना डेबीट कार्ड देण्यात येतील तसेच या कार्डबरोबर प्रत्येक गरीब कुटुंबाला एक लाख रुपयांचा विमा देण्यात येईल यामुळे गरीबांचे सक्षमीकरण होण्यास मदत होईल. योजनेअंतर्गत आर्थिक समावेशनाला गती आली असून, अटल पेंशन योजनेद्वारे नवीन निवृत्ती योजनांची व्याप्ती वाढत आहे.

*• पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल योजना –*

स्वतःची जागा नसलेल्या दारिद्र्यारेषेखालील लाभार्थ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत स्वतःची जागा खरेदी करण्याकरीता आर्थिक सहाय्य देण्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना ही नवीन योजना सुरु करण्यात आली. इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना अंतर्गत १ लाख घरे बांधण्याचे शासनाचे लक्ष्य आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टीवासी व मध्यमवर्गीय यांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत व २०२२ पर्यंत कोणीही घराविणा राहू नये असा शासनाचा प्रयत्न आहे.

*• गरीबांना मोफत गॅस जोडणी –*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील गरीब कुटुंबासाठी मोफत गॅस जोडणी योजना जाहीर केली. याद्वारे दारिद्र्यारेषेखालील कुटुंबाना याचा लाभ मिळणार असून त्यासाठी केंद्र सरकारने तब्बल ८ हजार कोटी रु.ची योजना आखली आहे. पंतप्रधान उज्ज्वला योजनेअंतर्गत गरीब कुटुंबातील महिलांच्या नावावरच गॅस जोडणी मिळेल. पंतप्रधानांनी या योजनेमुळे पहिल्या वर्षातच दीड कोटी व तीन वर्षात पाच कोटी कुटुंबापर्यंत गॅस पोहोचेल असा विश्वास व्यक्त केला.

*• केंद्रीय अंदाजपत्रकातील तरतूदी –*

केंद्रीय अंदाजपत्रक २०१६.१७ यात गरीबांकरीता तरतूदी करण्यात आल्या. त्यात घरातील महिलेच्या नावाने एल.पी.जी. कनेक्शनची योजना, गरीबांच्या फायद्यासाठी २००० कोटीची तरतूद, मनरेगासाठी ३८५०० कोटींची तरतूद, ३ लाख रेशनच्या दुकानात स्वयंचलीत प्रणाली असणार अशा तरतूदी केंद्रीय अंदाजपत्रकात करण्यात आल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात दारिद्र्या निर्मूलनासाठी केंद्र व राज्य सरकारांनी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. गरीबांच्या कल्याणासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले व होत आहेत तरी देखील भारतात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहेच.

*निष्कर्ष .*

- योजनांचा लाभ मागास आणि उपेक्षित समाज घटकापर्यंत पोहचायला हवा तसा पोहचला नाही.
- मूल्यांची घसरण हे भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.
- देशाचा विकास विशिष्ट वर्गापुरताच मर्यादीत राहिल्याचे दिसते.
- श्रीमंत व गरीब यांच्या उत्पन्नात कमालीची तफावत आहे.
- सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होतांना आढळतात.
- भाववाढीने खरेदी शक्तीत घट होवून दारिद्र्यात वाढ होते.
- सरकारने विविध योजना सुरु केल्या असल्या तरी अंमलबजावणीत दोष आहेत.
- विविध अभ्यासकांच्या, समित्यांच्या दारिद्र्या निर्धारणाच्या निकषांमध्ये विरोधाभास दिसून येतो.

• विकासाच्या वाटेवर गरीबी आणि दारिद्र्याचे निकष आणि परिणामसुद्धा बदलणे आवश्यक आहे.

• दारिद्र्याच्या स्वरुपात मूलभूत बदल घडून येऊ लागले आहेत याची नोंद दारिद्र्याचा अभ्यास करतांना महत्वपूर्ण ठरणार आहे.

भारतातील दारिद्र्याची व्यापकता मोठी व भिन्न आहे. समाजातील सर्व घटकांचे, पर्यायाने गरीबांचे उत्तम सामाजिकीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. संपन्न समाज निर्मिती म्हणजेच योग्य सामाजिकीकरण हेच खरे दारिद्र्या निर्मूलनाचे उत्तम स्वरुप होय.

*संदर्भ .*

१. भारतातील सामाजिक समस्या, प्रकाशक.कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २००७.
२. आर्थिक आणि जागतिक आर्थिक विकास, महाजन मुकुंद, निराली प्रकाशन, २०१०.
३. अर्थसंवाद, आक्टोबर.डिसेंबर २०१२ खंड ३६, अंक ३.
४ अर्थसंवाद, आक्टोबर.डिसेंबर २०१३.
५. दैनिक, महाराष्ट्र टाइम्स, दि. ०२ मे २०१६.
६. दैनिक, लोकमत, दि.०३ जून २०१६.
७. दैनिक, लोकसत्ता, दि. ०८ जुलै २०१४.
८. दैनिक, सकाळ, दि. २६ ऑगस्ट २०१४.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/